## पर्यावरणपूरक सेवा केंद्र

१) सेवा केंद्राची रचना किंवा बांधकाम वास्तुशास्त्राप्रमाणे व पर्यावरण पूरक असावे.

२) नैसर्गिक प्रकाश, हवा हे वास्तूत मुबलक प्रमाणात असावी.

३) सेवा केंद्रातील पावसाच्या पाणी रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे साठवण किंवा भूजल पातळीत वाढ करावी.

४) सेवा केंद्रातील पाय धुवण्याचे पाणी झाडांना देण्याची सोय करावी.

५) सेवा केंद्रात प्लास्टिक, थर्माकोल, रसायनयुक्त वस्तू वापरण्यास बंदी असावी.

६) सेवा केंद्रात फुलझाडे, लक्ष्मी प्राप्तीच्या ५ वनस्पती, आयुर्वेदिक वनस्पतीची लागवड करावी. जागा असल्यास विविध महत्वाचे वृक्ष लागवड करावी.

७) सेवा केंद्रात साजरा केला जाणा-या सर्व सण उत्सवांना अन्न नासाडी टाळावी, डी.जे. किंवा फटाके यांचा वापर करू नये.

८) सेवा केंद्रातील सेवेक-यांनी एकत्रित पणे पर्यावरणाचे विविध उपक्रम लोकसहभागातून राबवावेत. उदा.पावसाळ्यात वृक्षारोपण, वर्षातून दोनदा दुर्ग संवर्धन अभियानाअंतर्गत ऐतिहासिक वारसा जतन व जैवविविधता संवर्धन.

९) प्रत्येक केंद्रात पर्यावरण प्रकृती विभागाचे किमान २ प्रतिनिधी सेवेकरी संपर्कात असावे.

१०) आपले सण उत्सव, शास्रोक्त व पर्यावरण पूरक कसे साजरे करता येतील यासाठी सर्वांना मार्गदर्शन करावे. उदा.मातीची गणपती, प्रदूषण मुक्त ई-दिवाळी, नैसर्गिक होळी / रंगपंचमी इ.

११) केंद्रातील हवनासाठी वृक्षांची तोड न करता झाडांची छाटणी करून त्यांचा वापर करावा.

१२) सेवा केंद्रातील निर्माल्य पालापाचोळा व जैविक कचरा यांच्या पासून कंपोस्ट खत तयार करावे व त्यासाठी इतरांनाही मार्गदर्शन करावे.

१४) सेवा केंद्रात अपारंपारिक ऊर्जा स्रोत यांच्या वापरावर भर द्यावा व वीज, जल बचत करावी व त्यावर मार्गदर्शन करावे.

## पर्यावरणपूरक स्वामी सेवेकरी

१) नैसर्गिक साधन संपत्तीचा गरजेपुरताच वापर करावा.

२) वर्षात किमान पाच झाडे लावून संवर्धन करावे.

३) दैनंदिन जीवनात प्लास्टिक, थर्माकॉल व पर्यावरणास हानिकारक वस्तूंचा वापर टाळावा.

४) नजीकच्या ठिकाणी पायी किंवा सायकलीचा वापर करावा. शक्य झाल्यास खाजगी वाहनाऐवजी जास्तीत जास्त सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा.

५) घातक रसायनयुक्त पदार्थ, वस्तू सौंदर्य प्रसाधने यांचा वापर टाळावा व त्याविषयी जनजागृती करावी.

६) अपारंपारिक उर्जेच्या वापरांवर भर द्यावा. उदा.सौरऊर्जा, पवनऊर्जा, बायोगॅस इत्यादी.

७) गणेशोत्सवात प्लॅस्टर-ऑफ-पॅरीसच्या गणेशाच्या मूर्ती ऐवजी शेणामातीचा गणपती बसवावा व त्याचे सर्वांना महत्व समजवावे.

८) दिवाळीत फटक्यांऐवजी ई-फटाक्यांचा वापर व प्रचार प्रसार करावा. (ॲप/सॉफ्टवेअर साठी लिंक: www.dindoripranit.org )

९) होळी साठी वृक्षतोड न तोड न करता गाईच्या शेणाच्या गोव-या तसेच पालापाचोळा वापरावा.

१०) रंगपंचमीला रसायनयुक्त रंगांचा वापर न करता पानाफुलांपासून बनविलेल्या रंगांचा वापर करावा.